संक्षिप्त वृत्त

अक्कलकोट : भगवान दास यांचा सत्कार करताना शामराव मोरे यांच्यासह अन्य मान्यवर.

स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास भगवान दास यांची भेट

अक्कलकोट : मुंबईतील 'सेव्ह आर्ट' या संस्थेचे सचिव भगवान दास यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास भेट देत स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांच्या समवेत एयर इंडिया लोकाधिकार समिती सांताक्रूझचे मुख्य विश्वस्त रवी कुडाळकर, मुंबई परेलचे विजय शिंदे यांचा देखील सत्कार करण्यात आला. मनोज निकम, एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, धानप्पा उमदी, बाळासाहेब घाडगे, अभियंता अमित थोरात, निखील पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, दत्ता माने, शिवू स्वामी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

कुर्डूवाडी : आंतरभारती शाळेला स्मार्ट टीव्हीचे संच देताना माजी विद्यार्थी.

आंतरभारती प्राथमिक शाळा झाली डिजिटल

कुर्डूवाडी : कुर्डूवाडीतील आंतरभारती प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण घेता यावे यासाठी माजी विद्यार्थ्यांनी ४३ इंची स्मार्ट टीव्हीचे तीन संच शाळेला भेट दिले. आंतरभारती प्राथमिक शाळेतून १९९५ साली चौथी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी विशाल गावडे, डॉ. प्रसन्न शहा, श्रीकांत लचके, शितल पवार, पल्लवी गरड, स्वप्नील फडे, बालाजी लुक्कड, दर्शन देवी, विपुल गणगे, प्रज्ञा शास्त्री, डॉ. अल्पेश दोशी, डॉ. विपुल दोशी, कांचन भोंग, पुनम कुलकर्णी, अभिजित मुळे, सागर धोका, नीता कोरे, डॉ. रोहित दास, डॉ. पायल बिनायकीया, सुधीर तडकले, पुनम दोशी, स्वाती घावटे, रोहित शिंदे, राहुल गायकवाड, तानाजी घोडके, डॉ.आनंद पवार यांनी हे टीव्ही संच मुख्याध्यापक सुनील लावंड यांच्याकडे सुपूर्द केले. बी. टी. खुणे, शिवाजी सुरवसे उपस्थित होते.

नान्नज येथे शेतकऱ्यांना औषध फवारणी पंपाचे वाटप

उत्तर सोलापूर : तालुका कृषी कार्यालय उत्तर सोलापूर विभागाकडून तालुक्यातील शेतकऱ्यांना बॅटरी संचलित औषध फवारणी पंपाचे नान्नज येथे वाटप करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, मंडळ कृषी अधिकारी के. एन. थिटे, पर्यवेक्षक अडसूळ, एस. बी. इंगळे कृषी सहा. बी. एस. शिंगाडे, ज्ञानेश्वर गोडसे, एस. के. कुंभार, आर. एस. मोहिते, अश्विनी कोळेकर, व्ही. एस. बोसकर, जे. एस. अंधारे यांचे सहकार्य लाभले. नागनाथ पाटील, अशोक भोरे, अमोल सुतार, गणेश लामकाने, श्रीकृष्ण लामकाने, विलास गायकवाड, राम गुंड, सुधाकर क्षीरसागर, बाळू गवळी, हरी सुतार, केदारनाथ बहिर्जी, भैय्या माने व शेतकरी उपस्थित होते.

संघर्ष सेना वैद्यकीय सेलच्या जिल्हाध्यक्षपदी रणजित मळगे

सोलापूर :- संघर्ष सेनेच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकी मध्ये संघर्ष सेनेच्या वैद्यकीय सेलच्या जिल्हाध्यक्षपदी रणजित मळगे यांची निवड करण्यात आली. बैठकीत अध्यक्ष म्हणून संघटनेचे संस्थापक शेखर बंगाळे हे होते. यावेळी संघर्ष सेनेचे प्रदेश युवक अध्यक्ष चंद्रशेखर पाटील, युवक शहर अध्यक्ष संदिप कांबळे, जिल्हाध्यक्ष निखिल घोडके, ओबीसी अध्यक्ष गौरव पवार, मोहोळ तालुका अध्यक्ष राहुल सावंत, धनगर समाज प्रबोधन मंचचे अध्यक्ष विलास पाटील, क्रांतीवीर किसान सेनेचे अध्यक्ष करन गडदे, विशाल होसमनी, प्रतीक पवार, भिमराव माने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

दुधावरील अनुदानामुळे दिलासा

शेतकरी समाधानी; मागील अनुदान देण्याची मागणी

पिलीव/प्रतिनिधी

पशुखाद्याचे दरही कमी करावेत व शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण पशुखाद्य पुरवठा करावा. त्यामुळे दूध उत्पादन वाढीला मदत होईल. जे दूध संघ शासनाने जाहीर केलेला दर देत नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. शासनाने जाहीर केलेली दूध दरवाढ व अनुदान निवडणुकीपुरती न ठेवता कायमस्वरुपी ठेवून दिलासा द्यावा.

- **गणेश लेंगरे**, दूध उत्पादक शेतकरी, कुसमोड.

महाराष्ट्र शासनाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना १ ऑक्टोबरपासून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ असणाऱ्या दुधाला प्रतिलीटर ७ रुपये अनुदान जाहीर केल्याने दूध-उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

सरकारच्या अनुदानामुळे दुधाला २८ रुपये दरावर आता ५ रुपये ऐवजी ७ रुपये प्रतिलिटर अनुदान मिळून प्रतिलीटर ३५ रुपये एवढा दर मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळणार आहे. सध्याच्या महागाईच्या काळात पशुखाद्याचे गगनाला भिडलेले दर, वैरणीचे व औषधोपचाराचे वाढलेले दर, मजुराची वाढलेली हजेरी या सर्वच बाबींचा विचार करता शेतकऱ्यांना मिळणारा २५ ते २६ रुपये प्रतिलीटर हा दर अजिबात परवडत नव्हता.

दुधाच्या व्यवसायावर अवलंबून असणारे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आले होते. पण महायुती सरकारने राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना पहिल्यांदा पाच रुपये प्रतिलीटर अनुदान दिले. यानंतर आता निश्चित २८ रुपये दर व ७ रुपये प्रतिलिटर अनुदान यामुळे शेतकऱ्यांना ३५ रुपये एवढा थोडासा दिलासादायक दर मिळणार आहे, हे खरे असले तरी अनुदानाची व प्रत्यक्ष दराची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. अनेक खाजगी संघ या नियमाची अंमलबजावणी करीत नाहीत व शासनाने जाहीर केलेला दर हे खाजगी दूध संघवाले देत नाहीत. यामुळे शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या दराच्या कडक नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

शासनाने दूध अनुदानासह ३५ रुपये कायम ठेवावा, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांमधून होत आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावरच शासनाने जाहीर केलेली दूध दरवाढ सत्ताधारी महायुतीच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे. शासनाने मागील जाहीर केलेले अनुदान द्यावे, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांनमधून होत आहे.

पंढरपूर बाजार समितीत ५२८ कोटींची उलाढाल

गायकवाड यांची वार्षिक सभेत माहिती

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर बाजार समितीमध्ये बेदाणा शेतीमालाची रू. ३७० कोटी, डाळींब रू. ८० कोटी अशाप्रकारे सर्व शेतमालाच्या खरेदी विक्रीची ५२८ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे सभापती हरिष गायकवाड यांनी सांगितले.

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवारी (दि.२६) बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड साहेब यांच्या अध्यक्षते खाली व माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस मान्यवरांचे बाजार समितीचे उपसभापती राजूबापू गावडे यांनी स्वागत केले. फळे व भाजीपाला रू. ३६ कोटी, भुसार धान्ये रू. २१ कोटी, कांदा रू. १२ कोटी, जनावरे रू. ५ कोटी, केळी रू. ३ कोटी, वैरण रू. १ कोटी अशी एकुण बाजार समितीची वार्षिक उलाढाल ५२८ कोटी झालेली आहे. या उलाढालीमधून रू. ४.४० कोटी उत्पन्न बाजार समितीस मिळालेले आहे, असेही गायकवाड म्हणाले.

जास्तीत जास्त शेतीमाल विकी

पंढरपूर : गुणवंत शेतकऱ्याचा सन्मान करताना प्रशांत परिचारक. यावेळी उपस्थित अन्य मान्यवर.

केल्याबद्दल शेतकरी विक्रम प्रल्हाद डोंगरे रा. आढेगांव ता. मोहोळ, अभिमन्यू कोंडीबा जाधव, रा. जाधववाडी ता. पंढरपूर, रेवणनाथ भुजंगराव पाटील रा. घोटी ता. करमाळा, हणमंत भगवान झगडे रा. जळोली ता. पंढरपूर, जालींदर महादेव बनकर, रा. पिसेवाडी ता. माळशिरस, सुरज दोशी रा. गादेगांव ता. पंढरपूर, मारूती दाजी रूपनर, रा. महिम ता. सांगोला, आकाश संभाजी थिटे रा. भोसे ता. पंढरपूर यांचा व जास्तीत जास्त बेदाणा शेतीमाल विक्री केल्याबद्दल बेदाणा असोसिएशन, पंढरपूरचे अध्यक्ष सोमनाथ डोंबे तसेच आडते तुलसी ट्रेडिंग कंपनी प्रो. विनित अशोक बाफना, आशिष ट्रेडिंग कंपनी प्रो. संजय प्रल्हाद मस्के, धनंजय कोंडीबा गाडेकर, सोहम ट्रेडिंग कंपनी प्रो. अशोक बळीराम शिंदे, बालाजी फुट सेल प्रो. सचिन बबन गंगथडे, श्री विठ्ठल ट्रेडिंग कंपनी प्रो. राहुल सुभाष देवकर, राजकुमार दिपचंद फडे प्रो. अनिलकुमार दिपचंद फडे यांचाही सन्मान करण्यात आला.

दिनकर मोरे, अर्बन बँकेचे चेअरमन सतिश मुळे, प्रणव परिचारक, बाळासाहेब देशमुख, व्हा. चेअरमन कैलास खुळे, वामनराव माने, भगवान चौगुले, दाजी भुसनर-पाटील, लक्ष्मण धनवडे, संतोष घोडके, विवेक कचरे, बाळासाहेब माळी, पंडितराव भोसले, प्रशांत देशमुख, दिलीप गुरव, अरूण घोलप, तानाजी वायमोडे, विजय जाधव, सुदाम मोरे, रघुनाथ गोडसे, दत्तात्रय ताड, सिताराम नागणे, आण्णासाहेब बंगाळे, बाबासाहेब पाटील, हरीभाऊ गावंधरे, तमीम इनामदार, बाळासाहेब शेख, बाळासाहेब यलमर, अशोक बाफना, मुकुंददास मर्दा, सुरेश कुलकर्णी आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

अकलूज : निरा नदीत जलसमाधी आंदोलन करताना शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

शिवसेनेतर्फे निरा नदीत जलसमाधी आंदोलन

अकलूज/प्रतिनिधी

निरा नदीवरील पळसमंडळ-निमसाखर बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम तात्काळ चालू करावे या मागणीसाठी शिवसेनेतर्फे जल समाधी आंदोलन करण्यात आले.

शिवसेना इंदापूर तालुकासंपटक सुदर्शन रणवरे व युवा सेना सोलापूर जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांच्यावतीने आंदोलन करण्यात आले. इंदापूर बाजार समितीचे संचालक अप्पासाहेब जगदाळे यांनी पाठिंबा दिला. पळसमंडळ ते निमसाखर या गावांना जोडणारा निरा नदीवरील बंधारा हा गेल्या अनेक दिवसांपासून फुटलेला होता. पळसमंडळवरून निमसाखरला शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी रोज ये-जा करत असतात. या विद्यार्थ्यांचे याचबरोबर व्यापारी, शेतकरी वर्ग यांचेही अतोनात हाल होत आहेत हे लक्षात येता शिवसेनेने हा बंधारा तात्काळ दुरुस्त व्हावा, ही मागणी करण्यात आली.

शिवसेना माळशिरस विधानसभा तालुकाप्रमुख महादेव बंडगर, संजय काळे, शिवसेना जिल्हा समन्वयक भीम भोसले, नितीन शिंदे, योगेश कणसे, अरुण पवार, संदीप चौधरी, धोंडीराम सोनटक्के, रुपेश लाळगे, दत्ता साळुंखे, दुर्वा आडके आदी उपस्थित होते.

मराठा सेवा संघाकडून समतेची जपणूक : बोधले महाराज

कर्तव्यनिष्ठ सेवा पुरस्काराचे वितरण

पंढरपूर/प्रतिनिधी

मराठा सेवा संघाने समाजात समता, संस्कृती, समन्वय आणि संस्कार रुजवले, वारकरी संप्रदायाचा समतेचा विचार पुढे येऊन जाण्याचा हा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन हभप जयंत महाराज बोधले यांनी केले.

मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त पंढरपूर मराठा सेवा संघाने विविध क्षेत्रातील मान्यवरांना कर्तव्यनिष्ठ सेवा पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळी खा. प्रणिती शिंदे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अमित निमकर, एम. एन. गायकवाड, राजेंद्र कांबळे, सुनील वायमारे, किरण घाडगे, मनीषा जाधव आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी खा. शिंदे आणि हभप

पंढरपूर : पुरस्कारप्राप्त गुणवंतांसह खा. प्रणिती शिंदे, ह.भ.प. बोधले महाराज व अन्य.

जयंत बोधले यांच्या हस्ते संगीता पाटील, विनायक नलवडे, समीर कुंभार, धनंजय देशमुख, आनंद जगताप, नवनाथ पोरे, सूर्यकांत मोरे, मंजुषा घावटे, सुधीर चव्हाण, डॉ. शुभांगी तनपुरे, दिनेश चांदणे, प्रताप परकाळे यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र, शाल, पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. खा. प्रणिती शिंदे यांनी मराठा सेवा संघाच्या कार्याचा गौरव केला.

सूत्रसंचालन आगतराव भोसले, नितीन जाधव, सचिव नितीन आसबे, सुभाष तनमोर, सतीश रकटे, धनाजी मस्के, भारत विधाते, नितीन पाटील, प्रफुल्ल गोडसे, हनुमंत भोसले, मकरंद रणदिवे, गर्जेंद्र भालके, राजकुमार भोसले परिश्रम घेतले.

करमाळा : फुटपाथ तयार करण्याच्या कामाचे भूमिपूजन करताना महेश चिवटे, संजय शीलवंत, शैलेश खडके, विश्वासराव काळे पाटील आदी.

देवीचा रोडच्या बाजूने फुटपाथ कामाचे भूमिपूजन

जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या प्रयत्नांना यश

करमाळा : शहरातून देवीच्या माळकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूने वृद्धांना पहाटे व सायंकाळी फिरण्यासाठी २८० मीटरचा फुटपाथ तयार करण्याच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी (दि. २८) शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील हस्ते झाले.

कामासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५० लाख रुपयांचा निधी दिल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली आहे. यावेळी शहरप्रमुख संजय शीलवंत, शैलेश खडके, विश्वासराव काळे पाटील, आजिनाथ इरकर, बाबासाहेब तोरणे, दिगंबर देशमुख, भगत, संजय जगताप, निलेश चव्हाण, नागेश चेंडगे, केशव साळुंखे, पांडुरंग जाधव आदी उपस्थित होते.

करमाळा शहरात पहाटे व सायंकाळी वृद्धांना फिरण्यासाठी एक पादचारी मार्गाची गरज होती. फुटपाथवर वृद्धांना बसण्यासाठी खुर्च्या, वृक्ष लागवड, ऑक्सिजन पार्क करण्यात येणार असल्याची माहिती ठेकेदार संतोष गुगळे यांनी दिली आहे. पुढील काळात या रस्त्यावर अतिक्रमण होऊ नये याची काळजी नगरपालिकेने घ्यावी, अशी मागणी जेष्ठ नागरिक संघाने केली.

शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याची सांगोल्यात मिरवणूक

फटाक्यांची आतषबाजी, शिवरायांचा जयघोष

सांगोला/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी... जय शिवाजी, हर हर महादेव..चा गजर करीत शिवप्रेमी मंडळाच्या वतीने सांगोला शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ स्मारकाची मिरवणुक काढण्यात आली.

ग्रामदैवत श्री अंबिकादेवी मंदिरापासून प्रमुख मार्गावरून विविध फुलांनी सजवलेल्या मिरवणूक रथातून भव्य-दिव्य अशी फटाक्यांची आतिषबाजी करीत ढोल ताशे असे अनेक पारंपरिक वाद्यांसह वाजत-गाजत जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी हजारो शिवभक्त , मुस्लीम, बहुजन बांधवांच्या उपस्थितीत पेढे वाटून शिवतिर्थावर मिरवणुकीची सांगता झाली. सांगोला शहर सर्वत्र भगवेमय झाले होते.

सांगोला शहरात आगमन होताच एकच जल्लोष करण्यात आला. मिरवणुकीत शिवतेज ग्रुप वाद्य पथक पुणे पथकाने ढोल ताशा वाजवून मिरवणुकीत रंगत आणली. ठिकठिकाणी क्रेन व जेसीबीमधून पुष्पहार यालून पुष्पवृष्टी करून जल्लोषात जंगी स्वागत केले. मिरवणुकीतील शिवभक्तांनी पांढरा शर्ट पँट, हातात भगवे, डोक्याला केशरी टोपी, फेटे, महिला, युवतींनी डोक्याला फेटे बांधून मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने सर्वत्र रस्त्यावर तुडुंब गर्दी झाली होती. मिरवणूक मार्गावर महिला, युवतींनी महाराजांना औक्षण करून अभिवादन केले. कोल्हापूर येथून छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवशिल्प जल्लोषात जुनोनी, हातीद, पाचेगाव बुद्रुक, नाझरा मठ, अनकढाळ टोल नाका, वाटंबरे, कमलापूर, एखतपूर व पंढरपूर उड्डाणपुलाखाली असे ठिकठिकाणी स्वागत होत सांगोला येथील ग्रामदैवत श्री अंबिका देवी मंदिर येथे आगमन झाले.

आमदार शहाजीबापू पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे-पाटील, प्रा. पी. सी. झपके, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, डॉ. पियूष साळुंखे पाटील, यशराजे साळुंखे पाटील, सागर पाटील, आनंदा माने, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, अनिल इंगवले, सुरज बनसोडे, अक्षय बनसोडे आदींनी वाढेगाव नाका यासह विविध ठिकाणी पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. शिवराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्यावतीने क्रेनमधून पुष्पवृष्टी केली. त्यानंतर कडलास नाका येथे मुस्लीम बांधव तसेच सोनंद शिवप्रेमी तरुण मंडळ व कडलास शिवप्रेमी मंडळ ग्रामस्थ व ग्रामपंचायतच्यावतीने, वासुद-अकोला शाही नगरीच्यावतीने योगेश खटकाळे, दिपक खटकाळे, सूर्याजी खटकाळे, वैभव केदार आदींनी क्रेनमधून पुष्पवृष्टी केली.

शिवतीर्थावर समस्त मुस्लीम समाज सांगोला शहर व तालुका यांच्यावतीने सरबत वाटप केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात वीरशैव लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर युवक संयटनेच्यावतीने खाऊचे वाटप केले. बापूसो भाकरे, अरविंद केदार, बाळासाहेब शिंदे, रमेश जाधव, संतोष भोसले आदीसह अन्य पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जा. क्र. बांध/७८४/२०२४
दि. २७/०९/२०२४

माढा नगरपंचायत, माढा

ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना क्र. MCMADHA/ /२०२४

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या **स्वच्छ भारत अभियान २.० व स्वच्छ भारत अभियान बक्षीस रकमेतून** योजनेअंतर्गत अ. क्र. ०१ ते ०२ हाती घेण्यात आलेल्या विकासकामांची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार-अर्हताप्राप्त निविदाधारकांकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण ०२ कामे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. ३०/०९/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ पर्यंत सायं. ५ वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
माढा नगरपंचायत